| क्रमांक | माझी शाळा निबंध मराठी 10 ओळी |
| --- | --- |
| १ | माझी शाळा मला खूप आवडते आणि माझ्या शाळेचे नाव 'सावित्रीबाई हायस्कूल' आहे. |
| २ | दोन मजल्यांची आणि सुंदर अशी फुलांची बाग असलेली प्रसिद्ध शाळा आहे. |
| ३ | आमच्या शाळेत विज्ञान कक्ष, संगणक कक्ष आणि ग्रंथालय सुद्धा आहे. |
| ४ | शाळेतील शिक्षक शिक्षणाच्या बाबतीत खूप कडक आहेत पण तेच आम्हाला अभ्यासात नेहमी मदत करतात. |
| ५ | दर सहा महिन्यांनी आमची सहल जाते. कधी उत्पादक कंपन्यांना भेट देते तर कधी प्राणी संग्रहालयाला. |
| ६ | माझ्या शाळेत छोटेसे मैदान सुद्धा आहे जिथे मी आणि माझे सवंगडी सकाळी ७ वाजता प्रार्थना करतो. |
| ७ | मैदानात आम्ही पीटी तासाला लंगडी, खो-खो आणि कब्बडी सारखे खेळ खेळतो. |
| ८ | शाळेत आम्ही सर्व सण साजरे करतो आणि सणांसाठी आम्ही विद्यार्थी शाळा सजवतो. |
| ९ | दरवर्षी शाळेत स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम होतात. त्यात नाटक, देशगिते आणि शिक्षणाला प्रोत्साहन मिळेल असे कार्यक्रम करतो. |
| १० | माझ्या शाळेसारखी तुम्हाला हि तुमची शाळा प्रिय असेल असे मी समजतो. |